● रविवार, दि. २ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २११ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जालन्यातील खराब रस्त्यांबाबत हायकोर्टाचा दणका;

## महानगर पालिकेला बजावली नोटीस

### अॅड. महेश धन्नावत यांनी दाखल केली जनहित याचिका; पुढील सुनावणी १९ मार्चला

**जालना । प्रतिनिधी -** दयनीय अवस्था झालेल्या शहरातील खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिकांच्या होणाऱ्या हालाकीची गंभीर दखल घेत, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जालना महापालिका, महाराष्ट्र सरकार, जिल्हाधिकारी आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस जारी केली आहे. ही जनहित याचिका अॅड. महेश धन्नावत यांनी अॅड रूपेश जायसवाल यांच्यामार्फत सादर केली असून, त्यात खराब रस्ते, उघडे मॅनहोल याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

न्यायमूर्ती मंगेश पाटील आणि प्रफुल्ल खुबलकर यांच्या खंडपीठाने संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबत स्पष्टीकरण मागवल्याने या गंभीर नागरी समस्यांवर आता प्रशासनाला उत्तर द्यावे लागणार असून, पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे. याचिकाकर्ते महेश धन्नावत यांनी आपल्या याचिकेत नमूद केले आहे की, शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, खड्डे आणि उघडे मॅनहोल यामुळे शाळकरी मुले, पादचारी आणि वाहनचालकांचे मोठे हाल होत आहेत. त्यांनी न्यायालयाकडे मागणी केली आहे की, रस्त्यांची दुरुस्ती टिकाऊ आणि योग्य सामग्रीने केली जावी, जेणेकरून रस्त्यांची गुणवत्ता कायम राहील आणि नागरिकांना सुरक्षित प्रवास करता येईल. जलवाहिनी, सांडपाणी निःसारण पाईप आणि केबल वायर टाकण्यासाठी अनेक रस्त्यांची खोदकामे झाली. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर रस्ते पूर्ववत करण्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले. परिणामी, नागरिकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे, असे नमूद करून याचिकेत शहरातील अनिल जिंदल स्कूलकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. हा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून, विद्यार्थ्यांसह नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील अनेक अंतर्गत रस्त्यांची परिस्थितीही वाईट असून, ते अद्याप दुरुस्त करण्यात आलेले नाहीत. यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

याचिकेत शहरातील रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणाचा मुद्दादेखील उपस्थित करण्यात आला आहे. यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणी येत असून, शहरात वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः शाळा परिसरातील रस्त्यांवर वाहनांची प्रचंड गर्दी होत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याचिकाकर्त्यांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की, महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचे मूलभूत हक्क (अनुच्छेद २१) धोक्यात आले आहेत.



वारंवार तक्रारी करूनही महापालिका आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, त्यामुळे न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता भासली.

हायकोर्टाने महापालिका आणि महाराष्ट्र सरकारला नोटीस जारी केली आहे. त्यामुळे या गंभीर नागरी समस्यांवर आता प्रशासनाला उत्तर द्यावे लागणार आहे. पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे.

## दक्षिण आफ्रिकेचा इंग्लंडवर विजय

दक्षिण आफ्रिकेने आपली दमदार कामगिरी सुरू ठेवत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत सहज प्रवेश केला आहे. गट टप्प्यातील आपल्या शेवटच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा एकतर्फी सामन्यात ७ गडी राखून आणि १२५ चेंडू राखून पराभव केला आणि अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले. सामना संपण्यापूर्वीच दक्षिण आफ्रिकेने उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्रता मिळवली होती, मात्र या विजयासह त्यांनी ब गटात पहिले स्थान मिळवले. तर इंग्लंडचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये एकाही सामन्यात न विजय मिळवता माघारी जाणार आहे. इंग्लंड संघाप्रमाणेच पाकिस्तानचा संघही चॅम्पियन्स ट्रॉफीत एकही सामना जिंकू शकला नव्हता.


## लोकसेवेचा वसा कधीही सोडणार नाही

### माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन; संत-महंत व आ. लोणीकर यांच्या हस्ते आईसाहेब लॉन्सचे उदघाटन संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** सर्वसामान्य कष्टाळू मेहनती आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांची फळे ही माझी खरी ताकद असून सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या बळावरच मी मागील ४० वर्षे राजकारणात टिकून आहे अनेक बलाढ्य आणि धनाध्य ताकती माझ्यासमोर अनेक निवडणुकींमध्ये आल्या परंतु कार्यकर्त्यांच्या बळावर मी राजकारणात टिकून राहिलो लोकांच्या सेवेचा हाती घेतलेला हा वसा आणि कदापि सोडणार नाही असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

जालना येथे आईसाहेब लॉन्स व मंगल कार्यालयाचा उद्घाटन सोहळा व माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचा वाढदिवस संयुक्तरित्या साजरा करण्यात आला. आमदार बबनराव लोणीकर यांच्या वाढदिवसाच्या अवचित्य साधूनच मंगल कार्यालय व लॉन्स उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी मठाधिपती महंत भागवत गिरी महाराज, महंत बालकगिरी महाराज, गुरुवर्य ह भ प गजानन दादा शास्त्री महाराज, ह भ प नाना महाराज पुरुषोत्तमपुरीकर गुरुवर्य रामेश्वर महाराज आरगडे ह भ प भीम महाराज कनकवाडी ह भ प गणेश महाराज परतवाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत आईसाहेब लॉन्स व मंगल कार्यालय चा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की सर्वसामान्य जनतेच्या प्रेमामुळेच मी आठ वेळा विधानसभा निवडणूक लढवू शकलो व त्यापैकी पाच वेळा विधानसभेची निवडणूक जिंकू शकलो सर्वसामान्य कार्यकर्ता हीच आमची ताकद असून लोणीकर परिवार आज जन्म या सर्व प्रामाणिक आणि मेहनती कार्यकर्त्यांच्या ऋणात राहणे पसंत करेल. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, आपण राजकीय व सामाजिक जीवनात काम करत असताना ११०० पेक्षा अधिक मुलींचे कन्यादान लग्न केले असून या सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेतूनच मला राजकारणात आणि समाजकारणात नवी ऊर्जा मिळते गोरगरिबांच्या आशीर्वादामुळेच मी आजपर्यंत राजकारणात टिकून आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी नुसतं कर्तुत्व असून चालत नाही तर त्यासाठी आई-वडिलांच्या रूपाने पूर्वजनिक संचित देखील असावा लागतो आणि मला आई-वडिलांच्या रूपाने नेहमीच प्रेरणा आणि माझं कर्तुत्व सिद्ध करण्याची संधी वारंवार मिळाली आहेत आई-वडिलांच्या पूर्व पुण्यामुळेच मी जीवनात यशस्वी होऊ शकलो असे भाव उद्गार राहुल लोणीकर यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. आई-वडिलांच्या पूर्व पुण्यामुळेच मी आज या ठिकाणी उभा आहे आई-वडिलांच्या पुण्याईमुळेच राजकारणात आणि समाजकारणात



उभा राहू शकलो असेही राहुल लोणीकर पुढे म्हणाले.

आईसाहेब लॉन्स व मंगल कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी आमदार अर्जुनराव खोतकर आमदार हिकमत उढान, आमदार नारायण कुचे, आमदार राजेश राठोड, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, माजी आमदार संतोष सांबरे, विजय अण्णा बोराडे, उद्योगपती मनीष धूत, माजी आमदार अमरसिंह पंडित, शरद राव बोराडे, डॉ. प्रफुल्ल पाटील, सुकृत पाटील किशोर पवार, अनिरुद्ध खोतकर, भाऊसाहेब घुगे पंडितराव भुतेकर, संतोष मोहिते, अक्षय गोरंट्याल, रामेश्वर भांदरगे, ज्ञानेश्वर भांदरगे, उद्योगपती घनश्याम गोयल, उद्योगपती समीर अग्रवाल, सीमाताई खोतकर, संध्या देठे, कमलताई तुल्ले, अंकुशराव अवचार, बाबुराव शहाणे,

पान २ वर

युवा आदर्श


### अॅक्शनमोड ...

अमूक तमूक नेता
ऑन अॅक्शन मोड
उत्साह भरे अंगात
शब्द ऐकायले गोड
बसून राही खुर्चीत
गर्मीचे वाढले फोड
तिकडे फुटला पक्ष
हे खातात अक्रोड
आधी बसले शांत
घेऊन तक्या लोड
करायला हवे काही
आताशा घेती लोड
तुटूनि गेले आपले
फेविकॉलचा जोड
मैत्री करी नाठाळा
असूनही ते विजोड
योजना नाही स्पष्ट
कायम ती धरसोड
फ्लॅन करी ढिसाळ
समजती रण छोड
गेले सरदार तिकडे
करुन तोड न् मोड
आधा लढे त्यांचेशी
करू पाहती बिमोड

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जालन्यात प्रशांत कोरटकरविरुद्ध गुन्हा दाखल

### महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य;, मराठा समाज, शिवप्रेमींचे पोलिसांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकर याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सकल मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चा आणि शिवप्रेमींनी निवेदनाद्वारे कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांच्याकडे केली होती. यावरुन प्रशांत कोरटकरविरुद्ध भारतीय न्याय संहिता (२०२३) १५२, १९६,१९७,२९९, ३०२,३५१(२) आणि ३५२ अन्वये कदीम जालना पोलीस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नागपूर येथील प्रशांत कोरटकर या व्यक्तीने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन कॉल व इन्स्टाग्रामवरून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व माँसाहेब जिजाऊ यांच्याबद्दल अतिशय हिणकस व गलिच्छ वक्तव्ये करून बदनामी केली आहे. तसेच संबंधित व्यक्तीने विकृत लेखक जेम्स लेन याने केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि माँसाहेब जिजाऊ यांच्याबद्दलच्या अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. समाज माध्यमावरुन इंद्रजीत सावंत यांनी याची माहिती दिल्यानंतर आमच्या भावनेला ठेच पोहचली असून, असा व्यक्ती समाजासाठी धोकादायक ठरु शकतो. प्रशांत कोरटकर याने मराठा समाजाला व महापुरुषांना शिवीगाळ करून सामाजिक, जातीय व धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन सदर व्यक्तीने ही वक्तव्ये व धमकी देत असल्याने हे प्रकरण अतिशय संवेदनशील आहे. सदर ऑडिओ कॉल रेकॉर्डिंग इंद्रजीत सावंत यांच्या वॉलवर उपलब्ध आहे. त्याचा सिडीआर पोलिस तपासणीतून तो कॉल त्याच्याच मोबाईलमधून केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर कॉल/व्हिडिओ रेकॉर्डिंग/वृत्तांत त्याने त्याच्या मित्र गटात प्रसारीत केले आहे आणि तसा केला असल्याबद्दल इंद्रजित सावंत यांनी स्वतःची खातरजमा केली आहे.

तरी राज्य सरकार, गृह विभाग व पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशांत कोरटकर याच्याविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि

पान २ वर

प्रश्न सोडवण्याऐवजी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा, शिक्षण विभागाचा अजब न्याय; शिक्षक संघटना आक्रमक

## शिक्षणाधिकारी हटाव आंदोलन करणार

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रलंबित ठेवून त्यांना त्रास देणाऱ्या शिक्षणाधिकारी मंगल गायकवाड धुपे यांनी मराठवाडा शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकारामुळे शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

शिक्षकांचे प्रश्न मोठ्या प्रमाणात प्रलंबित ठेवल्या जात आहे. कर्मचारी वारंवार चकरा मारूनही त्यांचे प्रश्न सुटत नाही. आपले प्रश्न सुटत नसल्याने कर्मचारी मराठवाडा शिक्षक संघटनेची मदत घेतात. शिक्षक संघटनेचे पदाधिकारी वारंवार तगादा लावत असल्याने शिक्षणाधिकारी मंगल धुपे ह्या वैतागलेल्या आहे. वारंवार आंदोलने, उपोषणे यांच्या माध्यमातून पदाधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाची सोडवणूक करीत आहे व शिक्षणाधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव वारंवार करून देत आहे.

शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाची वाताहात झाली असल्याची प्रतिक्रिया एका शिक्षकाने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली आहे.

मागील वर्षी शिक्षणाधिकारी धुपे यांनी स्वतः बदली करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले होते. यश न मिळाल्याने याचा राग कामानिमित्त येणाऱ्यांवर त्या सातत्याने ठेवतात. कॅबिनमध्ये येणाऱ्या कर्मचाऱ्यावर आरडाओरडा करून त्यांना भांबावून सोडतात. एखाद्याला मॅडमची भेट घेणे म्हणजे सुळावरची पोळी असे झालेले आहे. मराठवाडा शिक्षक संघटना ही कर्मचाऱ्यांचे प्रश्न धसास लावणारी लढाऊ संघटना आहे. राज्यामध्ये जालना जिल्ह्यातील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा कामाचा झपाटा मोठा आहे. संघटनेचे काम शिक्षणाधिकाऱ्याच्या डोळ्यात खुपत आहें.



यासंदर्भात जिल्हा संघटनेचे अध्यक्ष रमेश आंधळे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले की, माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी गैरसमज आणि सूड भावनेने हेतुपुरस्सर जिल्हा उपाध्यक्ष जगन वाघमोडे यांच्या विरुद्ध खोटी तक्रार दिली आहे. हे योग्य नसून संघटनेच्या मार्फत योग्य ते पाऊल उचलण्यात आलेले असून येत्या ४ तारखेला शिक्षण संचालक कार्यालयाच्या समोर शिक्षणाधिकारी हटाव आंदोलन करण्यात येणार आहे.

संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव यांच्यासह संपूर्ण मराठवाड्यातून हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनात सहभागी होणार असून शिक्षण विभागात चाललेल्या अनियमिता तपासण्याची मागणी करणार असल्याचे म्हटले आहे.

जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष जगन वाघमोडे म्हणाले की, मी संघटनेच्या कामासाठीच आणि प्रलंबित कामासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयात गेलो असल्याचे निवेदनाद्वारे कळविले असून मी कोणत्याही प्रकारची उर्मटपणे त्यांच्याशी वागलो नसल्याने असेच वृत्तपत्रात संघटनेच्या मार्फत येणाऱ्या बातम्यांचा ओघ पाहता त्यांना माझ्यावर राग काढला आहे.

## संपादकीय

# भाकीत उष्णतेच्या लाटेचे!

यावर्षी देशभर कडाक्याची थंडी पडेल अशी शक्यता असताना म्हणावी तशी थंडी पडली नाही. भारताच्या उत्तर भागात डिसेंबर आणि जानेवारी या दोन महिन्यात कडाक्याची थंडी पडली. जानेवारीमध्ये तर सर्व शहरांचे तापमान नीचांकी स्तरावर पोहचले मात्र महाराष्ट्रात कडाक्याची थंडी अभावानेच पाहायला मिळाली. जानेवारी महिन्यात काही ठिकाणी थंडी पडली मात्र फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीलाच थंडी गायब झाली आणि उष्णता वाढली. १९०१ नोंदीनुसार सरासरीपेक्षा अधिक किमान तापमानात यंदाचा फेब्रुवारी महिना प्रथम क्रमांकावर आहे. फ ेब्रुवारी महिन्यात देशात १५.०२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यातच फेब्रुवारी महिन्याचे सरासरी कमाल तापम ान २९.०७ देखील दुसऱ्या सर्वोच्च पातळीवर होते. सध्या तर अतिशय विचित्र प्रकारचे हवामान अनुभवयास मिळत आहे. सकाळी गार वाऱ्यांसह कडाक्याची थंडी असते तर दुपारी कमालीचे गरम होते. काही शहरांचे सकाळचे तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी असते तर दुपारचे तापमान ३० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक असते. राज्यातील सर्वच शहरात जवळपास हेच तापमान आहे. सकाळी हुडहुडी भरणारी थंडी तर दुपारी घामाच्या धारा. वातावरणातील या बदलाने अनेकांचे आरोग्य बिघडले आहे. वातावरणातील या बदलाने थंडी, खोकला आणि सर्दीच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. लहान मुलांमध्ये तर थंडी तापाची साथच आली आहे. आता आपण मार्चच्या सुरुवातीस असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होऊ शकते. हवामान खात्याने तर तसा अंदाजच वर्तवताना सांगितले आहे की आगामी काळात उष्णतेच्या प्रमाणात वाढ होणार आहे. याशिवाय तापमानातील चढ उतार कायम राहणार आहे. इतकेच नाही तर अधूनमधून वाहणाऱ्या उष्णतेतही चढउतार होऊ शकेल. हवामान खात्याने वर्तवलेली ही शक्यता चिंताजनक आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते सध्या सौम्य ला निना स्थिती असून लवकरच अल निनोचा पॅटर्न तयार होणार आहे. तज्ज्ञांच्या मते भारतात यावर्षी मागील वर्षापेक्षा अधिक उष्णतेची लाटा येऊ शकतात. मार्च ते मे महिन्यात या उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक फटका बसू शकतो. मार्च ते मे महिन्यात महाराष्ट्रासह देशातील काही राज्यात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. या काळात उष्णतेच्या लाटेचे प्रमाणही जास्त राहू शकते असा इशाराही भारतीय हवामान विभागाने दिला आहे. जुलै ते सप्टेंबर या काळात देशात अल निनोचा प्रभाव दिसून येईल. असेही हवामान खात्याने सांगीतले आहे मात्र उष्णतेच्या लाटेच्या शक्यतेने सर्वांची चिंता वाढवली आहे. मागील वर्षीही उष्णता मोठया प्रमाणात वाढली होती मात्र यावर्षी उष्णतेच्या लाटेचे प्रमाण अधिक असल्याने चिंता अधिक वाढली आहे. मागील वर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. राज्यातील पाणी साठा कमी होत असताना तीव्र उन्हाळ्यामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यात जमिनीचा ओलावा कायम राखून पिके जागवण्यासाठी धरणांच्या पाण्याचे नियोजन सरकारी पातळीवर वेळीच करणे गरजेचे आहे. दिवसा आणि रात्रीचे तापमान सरासरीपेक्षा अधिक राहणार असल्याने विजेचा वापर अधिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यात विजेचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. परीक्षांचे दिवस असल्याने विद्यार्थ्यांनाही काळजी घ्यावी लागणार आहे. अल निनोच्या प्रभावाने जगभर वातावरणात बदल होत आहे. जगात एकाच वेळी वेगवेगळे हवामान पहावयास मिळत आहे. जगात कुठे उष्णतेची लाट अनुभवयास मिळते तर कुठे प्रचंड पाऊस पाहायला मिळतो तर कुठे कडाक्याची थंडी अनुभवयास मिळत आहे. अल निनोचा प्रभाव भारतासह जगातील सर्वच देशांवर पडत असल्याने केवळ भारताचीच नव्हे तर संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पीएमसी शाळा नळणी येथे विज्ञान दिन साजरा





**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** पीएमसी जि . प .प्रशाला नळणी खुर्द ता भोकरदन जि . जालना येथे २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य शिबिर तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी विज्ञानातून अध्यात्माची कास धरली जावी व भारतीय ज्ञान व परंपरा संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी त्या दृष्टीने मातृपितृपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री .एस .व्ही शेळके सर तर प्रम ुख आरोग्य मार्गदर्शक म्हणून डॉ .सुरज सेटिया एम बी .बी .एस एमडी मानसोपचारतज्ञ जालना व डॉक्टर ईश्वर जटाळे साहेब राजुर हे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री एच .व्ही .निकम गणित शिक्षक यांनी केले प्रास्ताविकात प्रमुख अतिथी यांचा परिचय व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० कार्यक्रम ंतर्गत विविध उपक्रमाचे आयोजन का करावे लागते याची माहिती उपस्थित त्यांना करून दिली प्रमुख अतिथी डॉ सुरज सेठीया यांनी प्रथम २८ फेब्रुवारी विज्ञान दिनाच्या शुभेच्छा विद्यार्थ्यांना देऊन आपल्या मार्गदर्शनाची सुरुवात अतिशय आनंददायी पद्धतीने केली डिप्रेशन व इन्झायटी ची कारणे व लक्षणे अतिशय सोप्या भाषेत चर्चेतून समजावून दिली तसेच मोबाईलचा वापराचे आपल्या आरोग्यावर व जीवनावर होणाऱ्या परिणामाची जाणीव नकळत मुलांना करून दिली प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरावर मुलांना त्यांना हवे वाटणारे एक चॉकलेट मिळत असल्यामुळे मुले आनंदाने मनातील भावना व्यक्त करताना दिसली खरोखरच मानसिक आरोग्य ही संकल्पना शिक्षणात किती म हत्त्वाची आहे याची जाणीव आम्हा सर्व शिक्षकांना काल चर्चासत्रातून चांगल्या प्रकारे कळाली व त्याचा वापर अध्याय-अध्यापनाच कसा करायचा याविषयी माहिती मिळाली कुमारवयीन मुलांच्या समस्या त्या कशा तळाव्यात याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन शिक्षकांना सुद्धा डॉक्टर सुरज सिटी या यांनी केले दुपारच्या सत्रात विज्ञानाच्या विविध प्रयोगाचे सादरीकरण मुलांनी विज्ञानशिक्षक श्री आर्य आर आर एफ पैठणकर सर व प्रयोगशाळा सहाय्यक श्री हिवाळे सर यांच्या म दतीने अत्यंत सोप्या व साध्या भाषेत विज्ञानाची महत्त्व प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांना समजावून दिले विज्ञानाचे प्रयोग सादरीकरण करताना म ुलांच्या चेहऱ्यावरील आनंद खूप काही सांगून गेला तसेच शाळेचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री एस पी देशमुख सर यांनी भारतीय ज्ञान परंपरा व संस्कृतीचे जतन व ओळख या अंतर्गत मातृ-पितृ पूजनसोहळा आयोजन करून अक्षरशा डोळ्याचे पारणे फेडणारा कार्यक्रम घडून आणला प्रत्येक पालक विद्यार्थी यांच्या मनातील व डोळ्यातील भावना सर्वकाही सांगून गेल्या वरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी आमच्या पाठीशी असणारे आमचे आधारवड शालेय समितीचे अध्यक्ष माननीय विजयरावजी वराडे तसेच सर्व सन्माननीय सदस्य यांचे अनमोल असे मार्गदर्शन व सहकार्य लाभले शाळेतील शिक्षक श्री येडी पितळे सर श्री सय्यद सर जाधव सर इंगळे सर रोडवे सर घुगे सर श्री डी आर जाधव सर व सपकाळ मामा यांनी खूप परिश्रम घेतले.

# प्रतोद पदी आमदार राजेश राठोड



काँग्रेस पक्ष हा सर्वसामान्य ज्ञान देणारा पक्ष असून अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे त्यागमूर्ती खासदार सोनीया गांधी, युवा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते युवकांचे लाडके नेतृत्व राहुल गांधी, एस.यू वेणुगोपाल जी, हर्षवर्धन जी सपकाळ, विजय वेडेंटीवार, यांनी दिलेल्या जबाबदारीला मी संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर फिरून बंजारा समाज कसा पक्षाकडे वळवता येईल याचा प्रयत्न करेन पक्षनेते आदरणीय अमित भैया देशमुख आणि माझ्यावर ही जबाबदारी दिली असून खऱ्या अर्थाने सामान्य कार्यकर्त्याला बंजारा सम ाजातील मुलाला पुन्हा एकदा प्रतोदपद देऊन माझ्यावर पक्षाने जी जबाबदारी दिली.हे केवळ एकनिष्ठतेमुळे शक्य झाले असून आई वडिलांच्या आशीर्वादाने त्यांनी दिलेला ज्ञानाचा वसा आणि अनुभव यातून काम करत राहील अनेक वर्षापासून काम करत असताना एन एस यु आय,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी,जिल्हा काँग्रेस कमिटी,

युथ काँग्रेसचा सदस्य,निरीक्षक, समन्वयक असे एक ना अनेक ठिकाणी काम करण्याची संधी पक्षाने दिली आणि त्या संधीच सोनही केलं हे सर्व एकनिष्ठतेमुळे शक्य झाले आहे असे प्रतिपादन माध्यमांशी बोलताना आमदार राजेश राठोड सांगितले आगामी काळात मराठवाड्याचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहाम ध्ये मांडण्याचा प्रयत्न करीन आणि न्याय देण्याचा प्रयत्न करून पुन्हा एकदा पक्षाने दिलेल्या जबाबदारी ला प्रामाणिक पणाने काम करण्याचा प्रयत्न करेन.यावेळी गोल्डमॅन सुरेश भुरा पवार, डॉ शेळके, जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले, संचालक सचिन राठोड, स्वप्निल राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती असून व्हाट्सअप फेसबुक व इन्स्टा ट्विटर या माध्यमातून आमदार राजेश भैय्या राठोड यांची प्रतोद पदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छां दिल्या जात आहे.

# विज्ञानाने जगाची क्रांती झाली - प्राध्यापक बनकर

## सिद्धार्थ महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा




**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. २८ फेब्रुवारी १९३०रोजी थोर भौतिकशास्त्राचे वैज्ञानिक सर चंद्रशेखर वेंकटरमन यांचे रामन परिणाम या संशोधना करिता १ ९३०मध्ये भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले होते. त्याचे औचित्य साधून भारत सरकारने १९८७ पासून संपूर्ण भारतामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात चे आदेश दिले होते. या दिनाचे औचित्य साधून माननीय प्राचार्य डॉ.रमेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक मनीष बनकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी आपल्या भाषणात विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन सरल झाले आहे .विज्ञानाने आपल्याला अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत .आपल्या दिवसाची सुरुवात आणि शेवट हा विज्ञानापासूनच होतो . विज्ञान तंत्रज्ञानातील विविध शोधामुळे मानवाने वेगवेगळ्या अडचणींवर मात केली आहे जसे आज माणूस विज्ञान तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे आपल्याला कोणता रोग होणार आहे याचे पूर्व निदान विज्ञानाच्या मदतीमुळे होते. तसेच कृषी क्षेत्रातील हरितक्रांती, माहिती जगतातील संगणक क्रांती ,वैद्यकीय क्षेत्रातील वेगवेगळ्या उपकरण व औषधींचा शोध हा विज्ञानाम ुळे लागला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगलाच पाहिजे परंतु त्याबरोबर विज्ञान क्षेत्रामध्ये रुची निर्माण होऊन आपण ह्या देशाचे नेतृत्व करण्याची ताकद ठेवली पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले. तत्पूर्वी सर चंद्रशेखर रमण यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक विनोदहिवराळे, प्राध्यापक डॉ. के .एस .पाटील प्रा.अनिल वैद्य प्रा.मनीष बनकर यांनी पुष्पहार अर्पण करून त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी उप प्राचार्य विनोद हिवराळे उपस्थीत होते.व्यासपीठावर प्रा. डॉ. जगतवाड ,ग्रंथपाल अशोक पठाडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिल वैद्य सर यांनी केले. आभार प्रा अशोक पठाडे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.सुनील चव्हाण ,डॉ. दीपक तांगडे ,डॉ. प्रदीप मिसाळ,प्रा.संतोष रुद्रवार, प्राध्यापिका डॉ.सारिका जाधव, श्री सुनील छडीदार यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### लोकसेवेचा वसा ...

डॉ जगन्नाथ खंडागळे, गणेशराव रोकडे संदीप तेला तहसीलदार प्रतिभा गोरे तहसीलदार सोनाली जोंधळे जालना तहसीलदार छाया पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी दादाभाऊ चौरे, पोलीस निरीक्षक शेवाळे, मौजपुरी पोलीस निरीक्षक घुगे, संदीप गोरे, पंजाबराव बोराडे, सतीश निर्वळ राजेश मोरे गणेशराव खवणे कैलास बोराडे वैजनाथ बोराडे सचिन बोराडे नागेशराव घारे सुजित जोगस गणेशराव घारे नितीन राठोड प्रसाद बोराडे नितीन सरकटे दारासिंग चव्हाण गजानन शिंदे विठ्ठलराव काळे प्रसादराव गडदे तानाजी शेंडगे रामकिसन बोडके विवेक काकडे नाथराव काकडे निवास देशमुख बी डी पवार महेश पवार मोहन आडे नरसिंग राठोड तुकाराम वैद्य रावसाहेब बाहेकर कैलास चव्हाण डॉ प्रदीप हुसे काथार डॉ बळीराम बागल डॉ अश्विनीकुमार काथार हरिराम माने सुदाम प्रधान किशोर हनवते शिवदास हनवते बाबा उगले श्याम नाना उडान ह भ प रमेश महाराज वाघ जयप्रकाश चव्हाण धनराज काबलीये संभाजी वारे ज्ञानेश्वर वायाळ जिजाबाई जाधव विक्रम उफाड गजानन उफाड संपत टकले प्रकाश टकले संतोष मोहिते राजेश राऊत विष्णू पाचफुले ीरी परभणी जिल्ह्यातील डॉक्टर प्रफुल पाटिल, सुभाषराव कदम चंद्रकांतराव डहाळे गणेशराव रोकडे राजेश देशमुख संतोषराव मुरकुटे रामराव रोकडे लक्ष्मण रोकडे गुत्तेदार सय्यद अली, अमित देशमुख, सागर बर्दापूरकर, यांची उपस्थिती होती. या सह परतूर तालुक्यातील भाजपा तालुकाध्यक्ष शत्रगुण कणसे

रमेश भापकर अशोकराव बुरकुले, संपत टकले रमेश संभाजी वारे रवींद्र सोळंके , दिनेश होलानी तुकाराम सोळंके, सुरेश सोळंके दिगंबर मुजमुले शिवाजी पाईकराव, नितीन जोगदंड, रमेश आढाव, डॉक्टर स्वप्नील मंत्री, डॉक्टर ज्ञानदेव नवल, प्रवीण सातोनकर संदीप बाहेकर कृष्णा आरगडे प्रकाश चव्हाण गजानन लोणीकर, सनी तन पुरे जगदीश पडोळकर राजेंद्र वायाळ उद्धवराव वायाळ यांची उपस्थिती होती.

### जालन्यात प्रशांत ...

त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच यात आणखी कोण सहभागी आहेत याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सकल मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चा आणि शिवप्रेमींनी निवेदनाद्वारे केली आहे. त्यानंतर प्रशांत कोरटकरविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी सकल मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनावर डॉ. संजय लाखे पाटील, अरविंद देशमुख, विष्णू पाचफुले, अशोक पडूळ, भरत मानकर, संभाजी देशमुख, राजेंद्र गोरे, काकासाहेब खरात, मंगेश चव्हाण, सुभाष कोळकर, ज्ञानेश्वर कदम, शरद देशमुख, यु. डी. देशमुख, गणेश उबाळे, लक्ष्मण गाडेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# देवठाना मंठा येथे ग्रामदरबार कार्यक्रमाचे आयोजन



**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील देवठाना मंठा येथे गुरुवार दि.२७ रोजी एक दिवस गावकर्यासोबत ( ग्रामदरबार) या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध विभागांच्या योजना, उपक्रम व दिल्या जाणार्या सेवा दारापर्यंत पोहोचविण्याच्या ऊद्देशाने विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांचेकडुन परिपत्रक निर्गमीत करण्यात आले आहे.या परिपत्रकानुसार छत्रपती संभाजी नगर विभागातील प्रत्येक तालुक्यातील आठवड्यातून एक ग्रामपंचायत ची निवड करुन त्या ठिकाणी शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थीत राहुन आपापल्या विभागांच्या योजना व उपक्रमांची माहिती व सेवा देण्यात येणार आहेत.दि.२७ फेब्रुवारी रोजी या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवणे बाबत देण्यात आलेल्या सूचना नुसार मंठा तालुक्यातून प्रथमच देवठाना मंठा या ग्रामपंचायत ची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी तहसीलदार सोनाली जोंधळे, गटविकास अधिकारी संतोष गगनबोने, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.कुंडकर, सहायक गटविकास अधिकारी हरिभाऊ ताठे, सरपंच नीलावती म ोरे,तालुक्यातील पदाधिकारी, सरपंच,विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, ग्राम पंचायत अधिकारी व नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

तालुक्यातील सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी यानी नागरिकांना गावात येवून ग्रामदरबार या उपक्रम ाच्या माध्यमातून आपापल्या विभागांच्या योजनांची माहिती देवून सेवा देण्यात याव्यात अशा सुचना आमदार लोणीकर यानी दिल्या.तालुक्यातून पहील्यांदाच हा कार्यक्रम आयोजीत केल्याबद्दल सरपंच, ग्रामसेवक तसेच अमोल मोरे यांचे अभिनंदन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विस्तार अधिकारी श्री पाटील, सरोदे, के जी राठोड, अन्सारी, निर्वळ, ग्रामपंचायत अधिकारी सुदर्शन सुर्यवंशी यानी प्रयत्न केले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहदेव मोरे यांनी केले तर अम ोल मोरे यांनी आभार प्रदर्शन केले

आठवड्यातून एकदा दर बुधवारी तालुक्यातील एका ग्रामपंचायत मध्ये हा कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती नोडल अधिकारी तथा सहायक गटविकासाधिकारी हरिभाऊ ताठे यांनी दिली.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जळगाव (सो.) या ठिकाणी जालना सम ाजकार्य महाविद्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्र मानेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील लोकांसाठी व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जळगाव (सो) येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. शाम राठोड, डॉ. योगेश मोरे, मंगेश थोरात, मंदाकिनी पठारे, सुवर्णा तोडकर या यांची उपस्थिती होती. राष्ट्र संत गाडगेबाबा यांच्या प्रतिम ेस पुष्पहार अर्पण करून शिबिराची सुरुवात करण्यात आली प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू वाघमारे यांनी केले तर प्रस्ताविक डॉ. नर्सिंग पवार यांनी केले. याप्रसंगी शिबिरामध्ये गावातील ४१ व महाविद्यालयातील २६ अशा एकूण ६७ व्यक्तींचा बी,पी, शुगर, रक्तगट ,थायरॉईड, हिमोग्लोबिन अशा विविध स्वरूपाच्या तपासण्या करण्यात आल्या व सर्वांना विविध प्रकारच्या टॅबलेटचे वाटप करण्यात आले.या शिबिराचे आयोजन प्रा. डॉ. नरसिंग पवार व राजू वाघमारे यांनी क्षेत्रकार्याच्या माध्यमातून केले होते. या प्रसंगी महाविद्यालयातील डॉ. सुधीर गायकवाड, डॉ. दीपक बुक्तरे, डॉ. बालाजी मुंडे, सोमेश गिरी, पृथुंम सावंत यांची उपस्थिती होती.

# विज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी म्हणजे तंत्रज्ञान - तहसीलदार सोनाली जोंधळे

**मंठा । प्रतिनिधी -** अशोक भाऊ चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मंठा संचलित अशोका पब्लिक स्कूल मंठा व छत्रपती संभाजी राजे विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय यांच्या समितीने विज्ञान प्रदर्शन राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भरवण्यात आले.



या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून मंठा तहसीलच्या तहसीलदार सोनाली जोंधळे तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक संचालक संजय कुमार चव्हाण होते. या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या प्रकल्पांचे इंग्रजी भाषेतून प्रभावीपणे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी इंग्रजीतून आत्मविश्वासाने संवाद साधून शिक्षणातील आधुनिक पद्धतींचे उत्तम उदाहरण घालून दिले. शालेय पातळीवर इंग्रजी संभाषण कौशल्ये ,वैज्ञानिक कौशल्य वाढवण्यासाठी शाळेने घेतलेले हे पाऊल विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी निश्चितच म हत्त्वपूर्ण ठरेल.

या विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांत प्रयोगशीलता, विचारशक्ती आणि आत्म विश्वास वाढला आहे. भविष्यात हे विद्यार्थी नक्कीच विज्ञान क्षेत्रात मोठे यश मिळवतील, असा विश्वास या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी व्यक्त केला. अशोक भाऊ चव्हाण सेवा संस्थेचे संस्थापक संचालक संजयकुमार चव्हाण, अलका चव्हाण आणि मुख्याध्यापक रेखा चिंचोली यांच्या म ार्गदर्शनाखाली झालेल्या या प्रदर्शनात शिक्षिका धनश्री कापडे, राधिका जोशी, स्वाती कदम, आरती कुलकर्णी, कांचन एखंडे, प्राजक्ता कुलकर्णी, प्रियंका चिंचणे, वंदना मोरे, अनिल निर्वळ, सविता राठोड, प्रणिता दळवी ज्योती शहाणे, यांनी मार्गदर्शन केले .

विद्यार्थ्यांनी आत्म विश्वासाने विज्ञानाच्या संकल्पना इंग्रजीतून प्रात्यक्षिक करून सादर केल्या. शिक्षण केवळ पाठांतरापुरते मर्यादित नसून, त्याला अनुभवाची व प्रात्यक्षिकाची जोड मिळणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संजयकुमार चव्हाण यांनी विज्ञान विद्या विज्ञानामा म्हणजेच 'विज्ञान हेच श्रेष्ठ आणि उपयुक्त ज्ञान आहे.' यातून विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्व पटवून दिले.

या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी चांद्रयान ३, हायड्रॉलीक लिफ्ट, डे-नाईट, वॉटर फिल्टर,बर्गलर अलार्म, वाईन्ड एनर्जी, डेसर्ट, वॉटर सायकल, हाऊ लंग्स वर्क, लेमन फ्लॉटिंग, ॲग्रीकल्चर, रोबोट, कूलर, ए टी एम, एडिशन मशीन असे विविध उपक्रम प्रदर्शित केले.सौरऊर्जा, चुंबकीय शक्ती, ज्वालामुखी, रोबोटिक सायन्स , एटीएम आदी प्रयोग मानवी अवयवांची माहिती देताना विद्यार्थ्यांनी शरीरातील विविध अवयव आणि त्यांची कार्ये प्रभावीपणे समजावून सांगितली.

# खडतर घाटाची रणस्पर्धा

## टेंभुर्णीच्या डॉक्टर पंडित सुरोशे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील निलेश लॅब चे संचालक डॉक्टर पंडित सुरोशे हे सामाजिक भावनेतून नेहमीच पुढाकार घेत असतात. विविध स्पर्धांमध्ये ते अग्रेसर असतात अशीच एक स्पर्धा *भारतातील अतिशय खडतर व आव्हानात्मक मानली जाणारी लोणावळा येथील टायगर हिल वर असणारी टा टा अल्ट्रा मॅरेथॉन रन स्पर्धा संपूर्ण घाटात असून स्पर्धेची सुरुवात रात्री एक वाजेपासून सुरु होते त्यामुळे लाईट डोक्यावर लावूनच पूर्ण करावी लागते. टेंभुर्णी येथील निलेश क्लीनिकल लॅब चे संचालक श्री पंडित सुरशे यांनी ५० किलोमीटर रन ची स्पर्धा अवघ्या ५ तास २८ मिनिटात पूर्ण करून नवीन वैयक्तिक रेकॉर्ड प्रस्थापित केला. त्याबद्दल टेंभुर्णी येथील मॉर्निंग ग्रुपच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले मॉर्निंग ग्रुपचे मित्र धीरज काबरा, डॉ पवन वऱ्हाडे, डॉ दीपक नागरे, डॉ शिवहरी जायभाये, सर्जेराव कुमकर, डॉ अविनाश सुरुशे, डॉ रमेश मोठे, मनीष सोम ाणी, गोपाल बांगड, राजू करवंदे, प्रदीप शेठ काबरा, तसेच आदर्श शिक्षक शेख जमीर सर, वेध रायगडाचे प्रतिष्ठान प्रांत उपाध्यक्ष प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, शेख अश्फाक, प्रसिद्ध चित्रकार संतोष बाबुराव, संतोष घोडके, नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक विश्वनाथराव सांगोळे, प्राध्यापकांपैकी प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, वासुदेव क्षीरसागर, माजी उपसभापती दिनकरराव उखर्डे, विष्णू बनकर, डॉक्टर आनंद भाले, विशाल देशमुख यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

गृहराज्यमंत्री कदम यांच्या राजीनामाची समाजवादी पार्टीतर्फे मागणी

# समाजाला घातक असलेल्या नीच प्रवृत्तीचा शेणदान करत निषेध




**पुणे -** गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्रामध्ये महापुरुषांचा अपमान करणारी वक्तव्ये केली जात आहेत. समाजवादी पक्षाचे नेते, प्रदेश अध्यक्ष अबू असिम आझमी अनेक दिवस विधिमंडळात आणि विधिमंडळाच्या बाहेर याबाबत णझ सारखा गंभीर कायदा करावा अशी मागणी करत आहेत. त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. तसा कायदा अस्तित्वात येण्याची गरज आहे जेणेकरून महाराष्ट्रात फोफावत असलेल्या अशा प्रवृत्तीला आळा बसेल. राहुल सोलापूरकर आणि डॉ. प्रशांत कोरटकर हे ... प्रवृत्तीची मुर्तीमंत उदाहरणे आहेत. कायदा तर झालाच पाहिजे त्याच बरोबर निच प्रवृत्तीच्या या दोघांवर सुद्धा तातडीने गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी निदर्शने करण्यात आले.

स्वारगेट एस.टी स्थानकावर भगिनी सोबत घडलेल्या अत्याचाराच्या घटनेने पुणे शहरातील नागरिकांना शरमेने मान खाली घालायला लगाली आहे. या घटनेमुळे पुण्याचा लौकिक धुळीला मिळाला आहेच त्याच बरोबर महिलांम ध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पुणेकर नागरिक म्हणून या घटनेची लाज समाजवादी पार्टी पुणे शहर ला वाटते आहे. गुन्हेगारावर वचक बसवणारी कठोर कारवाई तर झालीच पाहिजे त्याच बरोबर ज्यांच्या लापरवाही मुळे हि घटना घडली त्या दोषींवर सुद्धा कठोर कारवाई झाली पाहिजे या मागणीसाठी या गुन्हेगार व्यक्तीचे पिंडदान (अंडदान, शेणदान) करून निषेध करण्यात आला. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या राजीनामाची देखील मागणी करण्यात आली.

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी, सेनापती बापट पुतळा, अलका टॉकीज चौक, पुणे येथे झालेल्या या निषेध आंदोलना प्रसंगी यावेळी जांबुवंत सागरबाई मनोहर(अध्यक्ष पुणे शहर), अनिस अहमद(प्रदेश सरचिटणीस), दत्ता पाकिरे(शहर सरचिटणीस), शहाजहान झारी(शहर चिटणीस), विनायक लांबे (राज्य कार्यकारिणी सदस्य), प्रकाश कांबळे (माजी राजपत्रित अधिकारी) ड. अनिता देशमुख, दिपक पाटील, इब्राहिम यवतमाळवाले, अशोकराव गायकवाड, सलिम बडगेर आदी उपस्थित होते. शैलेंद्र मोरे, प्रदेशाध्यक्ष रिपब्लिकन जनशक्ती दीपक गायकवाड, सेव बुद्धा केव अँड हेरिटेज,लेणी संवर्धक पुणे आदी समविचारी संघटना देखील आंदोलनात सहभागी होत्या.

# जालन्यात पराडा दर्गा रोडवर कार लिंबाच्या झाडाला धडकल्याने दोन ठार तर दोन जखमी

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात कार लिंबाच्या झाडाला धडकल्याने दोन ठार तर दोन जखमी झालेत. दुपारी ३ वाजेच्या सुमारास अंबड तालुक्यातील पराडा दर्गा रोडवर असलेल्या लिंबाच्या झाडाला कार जाऊन आदळल्याने हा अपघात झालाय. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन जखमीना नागरिकांच्या मदतीने अंबडच्या उप जिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दोघांना तपासून मयत घोषित केले तर दोघांना प्राथमिक उपचार करून जालन्यातील घाटी दवाखान्यात रेफर केले. १. विनय सुनिल देशमुख (२४ वर्ष) राहणार माळीपुरा जुना जालना २ रुषीकेश रामलाल जाधव (२२ वर्ष ) रा. कसबा जुना जालना मयताचे नाव असून जखमीचे नाव अजून कळू शकले नाही.



# एक लाख रुपयाची लाच घेतल्याप्रकरणी पोलीसावर कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात एक लाख रुपयाची लाच घेताना सहाय्यक पोलीस निरीक्षकासह पोलिस कॉन्स्टेबला लाचलुचपत विभागाने पकडलंय.. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड व पोलीस कॉन्स्टेबल गोकुळदास देवळे अशी कारवाई करण्यात आलेल्यांची नावं



असून ते आष्टी पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. एका वाळु वाहतूकदारावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या कारवाईत मदत करण्यासाठी एक लाख रुपयांची लाच घेताना बीड लाच लुचपत विभागाने ही कारवाई केलीये. त्यामुळं पोलीस दलात खळबळ उडाली.

# कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनाला सुरुवात




# कोनड बु. येथे शहीद बद्री भीमराव नागरे यांचा १६ वा स्मृतिदिन संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** शासकीय मान्यवरांच्या ईतमात तसेच म ाजी सैनिक संघटनेच्या हजेरीत व सर्व गावकऱ्यांच्या उपस्थितीत सकाळी१०वाजता संपन्न झाला, २००९ मध्ये बद्री नागरे हा ड्युटीवर असताना अपघातातून त्याला देशासाठी शहीद व्हावे लागले, त्यावेळी त्याचे वय अवघे २४ वर्ष होते नागरे कुटुंबावर त्याकाळी फार मोठा आघात झाला मात्र दुःखात असताना त्यांना आपल्या शहीद मुलाचे उतराई होण्यासाठी कायम तो स्मरणात राहावा करिता आई गंगुबाई वडील भीमराव व भाऊ समाधान नागरे, अनिल नागरे, यांनी कुठल्याही सैनिकाचा ऊर भरून यावा असे भव्य स्मारक बांधून गेली १६ वर्ष भव्य दिव्य असा स्मृतिदिन फार मोठ्या स्वाभिमानाने साजरा करीत आले असून याप्रसंगी तहसील कार्यालय जाफराबाद यांचे वतीने मा नायब तहसीलदार मंगेश साबळे साहेब, जाफराबाद पोलीस स्टेशनचे मा एपीआय तायडे साहेब , तलाठी काळे साहेब तलाठी साळवे साहेब व माजी सैनिक जिल्हाध्यक्ष कुंडलिक पाटील मुठ्ठे साहेब , शहीद पिता सुरेश पेहरे ,भीमराव नागरे ,यांनी शहिदाला पुष्प चक्र अर्पण करून मानवंदना दिली, याप्रसंगी माजी सैनिक रम ेश खरात, विठ्ठल साळवे, शंकर ताठे, परमेश्वर जाधव, रंगनाथ खरात, काशिनाथ पंडित, नारायण महाले, त्याचप्रमाणे सरपंच विलास शिंदे वरुड, शिंदे सर, आणि गावातील विजय नाना परिहार, भाऊराव बकाल, धोंडन आप्पा घोडके, उपसरपंच ईश्वर परिहार, मा. स. सुभाष परीहार, डॉक्टर अशोक परीहार, गणेश अण्णा परिहार, रामेश्वर परिहार, रमेश वायाळ, आदी मान्यवर उपस्थित होते शाहीर नानाभाऊ परिहार यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन करून तसेच महाराष्ट्र गीत सादर केले व सामुदायिक राष्ट्रगीत सादर करून स्वर्गीय माजी सैनिक एकनाथ विठोबा परिहार कोनड बु. यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सांगता झाली,



# विद्यार्थ्यांनी सादर केले नाविन्यपूर्ण १८० विज्ञान प्रकल्प

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये आयोजित दोन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन आज शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी शाळेचे संस्थापक अध्यक्ष विनायककुमार कोठारी यांच्याहस्ते झाले. पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सौरऊर्जा, चंद्रयान, रेन वॉटर हार्वेस्टिंग, पर्यावरण संवर्धन, ग्रामर प्रोजेक्ट हॉटे सेन्स, पाणी वाचवा, पाणी आडवा, पाणी जिरवा अशा विविध महत्त्वपूर्ण १८० विज्ञान प्रकल्पांनी प्रदर्शनाला वेगळीच झळाळी प्राप्त करून दिली.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती लोंढे, ग्रीनलँड स्कूलच्या संचालिका श्रीम ती कटके, शाळेच्या संचालिका छायादेवी कोठारी, सचिव प्रसन्ना कोठारी, कोषाध्यक्ष तृप्ती कोठारी, भारतीय जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन, गजानन सरस्वत, धनराज काबिलिये, श्री. देसरडा , अजित भालेराव, प्रा. डॉ. बी. जी. श्रीरामे, श्री. ठाकूर, डॉ. सचदेव यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे मान्यवरांनी कौतुक करून विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा जागृत करणारे उपक्रम राबविले जात असल्याबद्दल शाळेचे अभिनंदन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मॅरलीन मनास आणि प्रशासकीय अधिकारी डॉ. प्राजक्ता देवकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनासाठी शिक्षकांनी स्वतः खूप मेहनत घेऊन विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेत त्यांना सहकार्य करत त्यांची जिज्ञासा आणि सर्जनशीलता वृद्धिंगत करण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल शाळा व्यवस्थापनाच्या वतीने शिक्षकांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

उद्घाटनपर भाषणात शाळेचे अध्यक्ष विनयकुमार कोठारी म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होणे आवश्यक आहे. विज्ञान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे आणि नवीन संशोधन व नवकल्पनांमुळेच समाजाचा विकास होतो. विद्यार्थ्यांनी प्रयोगशीलतेला चालना द्यावी, नव्या संकल्पनांचा स्वीकार करावा आणि भविष्यात नाविन्यपूर्ण संशोधन करावे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून त्यांच्यातील वैज्ञानिक जाणीवा अधिक दृढ होईल, असा असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हे दोन दिवशीय विज्ञान प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले असून, शनिवार हा शेवटचा दिवस असून, दुपारी १२ वाजेपर्यंत शहरातील तसेच तालुक्यातील सर्व शाळांनी याला भेट द्यावी, असे आवाहन शाळा व्यवस्थापनाने केले आहे.



जालना येथे आईसाहेब लॉन्सच्या उदघाटन प्रसंगी परभणी जिल्ह्यातील पालम येथील गणेश रोकडे, राम रोकडे, लक्ष्मण रोकडे, लिंबाजी भोसले पालम येथील लोकप्रतिनिधींनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचा वाढदिवसानिमित्त खोबऱ्याच्या वाट्या व खारका असलेला हार घालून अनोखा सत्कार केला.

## विहिरीतून अवैध पाणी उपसा

### एमआयडीसीला पाणी पुरवठा केल जात असल्याचा ग्रामस्थांचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** कुंभेफळ येथील विहिरीतून अवैध पाणी उपसा केला जात असल्याची बाब उघडकीस आलीय. अवैधरित्या पाण्याची चोरी करून सदरील पाणी एम. आय. डी. सी ला पुरवठा केल जात असल्याचा आरोप कुंभेफळ येथील ग्रामस्थांनी केलाय. दरम्यान, विहिरीतून अवैध पाणी उपसा होत असल्याचं समजताच कुंभेफळ येथील ग्रामस्थांनी याची माहिती जालना तहसील आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी तहसील आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन केली पाहणी करत अवैध पाणी उपसा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मोटारी पाटबंधारे विभागाकडून जप्त करण्यात येऊन अवैध पाणी वापरणाऱ्या एम.आय.डी.सी. मालकावर कारवाई करण्याचा इशारा पाटबंधारे विभागच्या अधिकाऱ्यांनी दिलाय. दरम्यान, यावेळी कुंभेफळ येथील ग्रामस्थांचा मोठा जमाव जमला होता. यावेळी बोलताना कुंभेफळ च्या सरपंचांनी विहिरीतून होत असलेला अवैध पाणी उपसा थांबवण्याची मागणी केली.

## मंठा शिवसेनेच्यावतीने केदारवाकडी येथे बैलगाडा शर्यतीचे उदघाटन




**मंठा । प्रतिनिधी -** येथील तालुका शिवसेनेच्या वतीने आयोजित स्पर्धेत शेकडो बैलगाड्यांचा सहभाग मंठा  तालुका शिवसेनेच्या वतीने म हाशिवरात्रीनिमित्त  केदारवाकडी ता. मंठा येथे शुक्रवार (ता. २८) रोजी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यांच्या हस्ते झेंडी दाखवून करण्यात आले. शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी आयोजित केलेल्या या स्पर्धेला बैलगाडा प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, म ाजी उपसभापती किसनराव मोरे, तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे, योगेश अवचार, दिलीपराव कव्हळे, तुळशीराम कोहिरे, गजानन अवचार, राजेभाऊ कव्हळे, संकेत साखरे, बाळासाहेब देशमुख, भगवान गायकवाड, प्रदीप अवचार यांची उपस्थिती होती. या स्पर्धेमध्ये जालना जिल्ह्यासह चिखली, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, परभणी, मराठवाडा व मराठवाडा बाहेरील स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धेचे प्रथम बक्षीस सभापती ए.जे.बोराडे यांच्यावतीने ४१,१११/-, द्वितीय बक्षीस तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे - ३१,१११/-, तृतीय बक्षीस योगेश पाटील अवचार - २१,१११/-, चतुर्थ बक्षीस दिलीपराव कव्हळे - १४,१११/- , पंचम बक्षीस राजेभाऊ कव्हळे - ११,१११/- सहावे बक्षीस दत्ताराव चव्हाण - ७१११/-, सातवे बक्षीस प्रदीप अवचार - ५१११/- यांच्यावतीने जाहीर करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये पंचकमिटी म्हणून उद्धवराव कव्हळे, श्रीनिवास कव्हळे, महादेव कव्हळे,शिवाजी कव्हळे, रम ेश कव्हळे, बंडू बिडवे, राहुल कव्हळे, गुलाब कव्हळे, बाळू कव्हळे, पवन कव्ह ळे, भाबट, बोराडे, आगे, राठोड यांच्यासह अनेकांनी काम पाहिले. भव्य बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी बैलगाडा प्रेमींनी मोठी गर्दी केली होती. स्पर्धा यशस्वीतेसाठी ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## जेईएसमध्ये राष्ट्रीय परिषदेचा भित्तीपत्रकाचे विमोचन

**जालना । प्रतिनिधी -** येथील जेईएस महाविद्यालयाचे क्रीडा विभागाचा वतीने २ दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे भित्तीपत्रकचे विमोचन करण्यात आले.

या महिन्यात दि.२८ते २९ म ार्च रोजी जेईएस महाविद्यालय क्रीडा विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन होणार आहे, या दोन दिवशीय परिषदेचे स्वरूप अंतर विद्याशाखीय असून यात शिक्षण शास्त्र, शारीरिक शिक्षण व क्रीडा, योग व इतर सर्व शैक्षणिक संकुलाचे शिक्षक व विद्यार्थी भाग येऊ शकतात तसेच दोन दिवशीय परिषदेत शैक्षणिक व क्रीडा विषयी चर्चा व शोध पत्र सादर होणार आहे व उत्कृष्ट शोध पत्रांना पुरुस्कार देण्यात येणार आहे. यात विशेष म्हणुन महाविद्यालयीन व शालेय विधार्थी देखील सहभाग घेऊन शकतात त्यांचा साठी विविध उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात येणार आहे,असे यावेळी बोलतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले

यावेळी क्रीडा संचालक डॉ. हेमंत वर्मा, आय क्यू एस सी चे संचालक डॉ. गणेश रोकडे डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. सुशांत देशमुख , डॉ.एस जे इंदूरकर ,डॉ. भाग्यश्री बियाणी उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra)  Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.